बापांची शाळा

Fatherhood Campaign, Maharashtra

# पुरुषांसाठी प्रशिक्षण मार्गदर्शिका

## जबाबदार पितृत्व अभियान, महाराष्ट्र



सेंटर फॉर हेल्थ ॲण्ड सोशल जस्टीस, नवी दिल्ली व प्रोग्राम 'एच' यांच्याकडून साभार

२०१३

# जबाबदार पितृत्व अभियानः पुरुषांसाठी प्रशिक्षण मार्गदर्शिका

## सत्र १: संगोपन (काळजी)

**सत्राचा उद्देश:** या सत्रामुळे सहभागींची संगोपन म्हणजे काय आणि आपल्या दैनंदीन जीवनातील संगोपनाचे महत्व या संदर्भातील समज वाढेल.

**सत्राची पद्धती:** चर्चा

**साहित्य:** चार्ट पेपर, मार्कर इ.

**सत्रासाठी लागनारा वेळ:** १ तास ३० मिनिटे

**कृती:**

- प्रत्येक सहभागीला एक एक चार्ट पेपर आणि मार्कर द्या. सहभागींना चार्ट पेपर च्या मध्यभागी ‘संगोपन’ हा शब्द लिहायला सांगा
- या नंतर सहभागींना सांगा की ‘संगोपन’ या शब्दाशी निगडीत जे शब्द तुम्हाला सुचतात ते आपल्या चार्ट पेपरवरती लिहा. या कामासाठी १५ मिनिटांचा कालावधी आहे असे सहभागींना सांगा
- सगळ्यांचं लिहून झाल्यावर सहभागींना सांगा की प्रत्येकाने आपण चार्ट पेपर वर लिहिलेले शब्द वाचून दाखवा. प्रत्येकाला वाचनासाठी २ मिनिटांचा वेळ द्या
- कोणत्याही दोन सहभागींना पुढे बोलावून प्रत्येक सहभागीने शब्द वाचत असताना ते शब्द फळ्यावर/ चार्ट पेपर वर लिहायला सांगा
- सगळ्यांचे शब्दांचे वाचन करुन झाल्यावर फळ्यावर शब्द लिहिणाऱ्यांपैकी एकाला सगळे शब्द पुन्हा एकादा वाचून दाखवायला सांगा
- या नंतर सगळ्या सहभागींबरोबर मोठ्या गटात पुढील प्रश्नांच्या अधारे चर्चा करा
    १. संगोपन या शब्दाची व्याख्या कोणत्याही एका कामाचे उदाहरण देऊन करता येईल का?
    २. दुसऱ्या व्यक्तीने आपली काळजी घेतली तर आपल्याला चांगले वाटते का? का?
    ३. दुसऱ्या व्यक्तीची काळजी घेताना आपल्याला चांगले वाटते का? का?
- सत्राच्या शेवटी सहभागींना समजावून द्या की सर्वांनी यादी केल्याप्रमाने संगोपन करणे या शब्दाशी संबंधीत शब्द वेगवेगळे आहेत आणि त्यांच्यामध्ये विविधता आहे. त्यामुळे कोणत्याही एका प्रकारच्या कामाला संगोपन करणे म्हणता येणार नाही.

# सत्र २: पुरुष आणि संगोपन

**सत्राचे उद्देश:** या सत्राच्या मदतीने सहभागींना संगोपन या शब्दांशी संबंधीत भावनात्मक पैलू समजतील

**सत्राची पद्धती:** चिंतन आणि शेयरींग/ फिश बाऊल

**सत्रासाठी लागनारा वेळ:** १ तास ३० मिनिटे

**साहित्य:** बसण्यासाठी सतरंजी

**कृती:**

- सर्व सहभागींना एक आत आणि एक बाहेर अशा दोन गोलांमध्ये बसायला सांगा. फॅसिलिटेटर ने आतल्या गोलात सहभागींबरोबर बसावे
- सर्वजण बसल्यावर सहभागींना सांगा की आता आतल्या गोलात बसलेल्या सहभागींबरोबर काही विषयावर साधरणपणे २० मिनिटे चर्चा केली जाईल. बाहेरच्या गोलात बसलेल्या सहभागींनी लक्षपूर्वक ती ऐकायची आहे आणि चर्चा संपल्यावर त्याबद्दल त्यांच मत सांगायच आहे
- आतल्या गोलात बसलेल्या सहभागींना पुढील प्रश्नांवर त्यांचे अनुभव व्यक्त करायला सांगा
    १. तुम्ही कधी एखद्या पुरुषाला संगोपन करताना पाहिलं आहे का? तेव्हा तुम्हाला काय वाटलं? एखादी घटना वर्णन करा
    २. तुम्ही स्वत: कधी कोणाचे संगोपन केली आहे का? तेव्हा तुम्हाला कसं वाटत होतं? एखादी घटना वर्णन करा
- आतल्या गोलातील सहभागींचे अनुभव सांगून झाल्यावर त्यांना विचारा की आपले अनुभव सांगून झाल्यावर तुम्हाला आत्ता कसं वाटतं आहे
- यानंतर बाहेरच्या गोलातील सहभागींना अनुभव ऐकून काय वाटले याबद्दल बोलयला सांगा. याचबरोबर बाहेरच्या गोलातील सहभागींना जर त्यांचे अनुभव सांगायचे असतील तर त्यांना संधी द्या
- सत्राच्या शेवटी सहभागींना सांगा की संगोपन ही स्वाभाविक क्रिया आहे. यामध्ये महिला, पुरुष किंवा ट्रान्सजेन्डर व्यक्ती असू शकतात. यामुळे फक्त देखभाल केली जाणाऱ्या व्यक्तीला फायदा होत नाही तर देखभाल करणाऱ्या व्यक्तीलाही त्यातून आनंद मिळतो आणि त्या दोघांमध्ये भावनिक नाते तयार होते. पुरुष देखभालीच्या प्रक्रियेत सहभागी नसल्याने एकीकडे महिलांवरील कामाचे ताण वाढतात तर दुसरीकडे पुरुषांचे आपल्या मुलांबरोबर, आई–वडीलांबरोबर भावनिक नाते तयार होऊ शकत नाही. यातून भावनिक नुकसान होते. महिला असो किंवा पुरुष सर्वांना संगोपनाची आणि देखभाल करण्याची गरज असते. जर आपल्याला मानवी नातेसंबंध सुधारायचे असतील तर पुरुषांनीही देखभालीच्या प्रक्रियेत सहभागी व्हायला हवं. पुरुषांना आपल्या परिवाराची देखभाल करण्यासाठी आणि त्यमधून निर्माण होणाऱ्या आनंदाचे महत्व पटवून देण्यासाठी आपण सर्वांनी सहभागी होणे गरजेचे आहे.

# सत्र.३ कुटुंबाचे संगोपन

**सत्राचे उद्देश:** या सत्रामध्ये प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारे सहभागींना संगोपनाचे महत्व समजेल

**सत्राची पद्धती:**

**सत्रासाठी लागनारा वेळ:**

**साहित्य:** फुगे आणि मार्कर

**कृती:**

- सर्व सहभागींना प्रत्येकी २ फुगे द्या. त्यांना ते फुगवून बांधून ठेवायला सांगा. फुगे फुगवत असताना ते फुटु नयेत याची दक्षता घ्यायला सहभागींना आवर्जुन सांगा
- फुगे फुगवून झाल्यावर सहभागींना सांगा की ही तुमची बाळं आहेत.
- सहभागींना मार्कर द्या आणि फुग्यांना डोळे, कान, नाक, ओठ इ. अवयव काढायला सांगा. सर्वांनी आपल्या बाळांना जास्तीत जास्त चांगले सजवावे यासाठी सहभागींना प्रोत्साहीत करा
- फुग्यांपासून बनवलेल्या बाळांना आनखी जिवंत करण्यासाठी त्याला एखादे नाव ठेवायला सांगा
- यानंतर सहभागींना सांगा की तुम्हाला तुमच्या या बाळांना दिवसभर काळजीपुर्वक संभाळायचं आहे. यांना दिवसभर सांभाळायचं आहे. त्याचं खाणं-पिणं, कपडे इ. या सगळ्यांची तुम्हाला काळजी घ्यायची आहे.
- सहभागी काळजी पुर्वक बाळांची काळजी घेतील याची खात्री सहभागींकडून करून घ्या. आणि त्यांना बाळांची काळजी घेण्यासाठी प्रोत्साहीत करा.
- सर्व सहभागींनी दिवसभर बाळांना संभाळण्याचे काम केल्यानंतर संध्याकाळी किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी पुढील प्रश्नांवरती सहभागींबरोबर चर्चा करा.
    १. हि फुग्यांची बाळं तुमच्या रोजच्या आयुष्यात कशा प्रकारे दखल देत होती?
    २. त्या वेळी तुम्हाला काय वाटत होते?
    ३. बाळांना संभाळत असताना कोणकोणत्या अडचणी जाणवत होत्या?
    ४. कोणतं काम बाळांना सांभाळत असताना तुम्हाला चांगलं वाटत होतं?
    ५. तुम्ही कोणाला मदत मागीतलीत का? कोणती?
    ६. जे कोणी आपल्या फुग्याच्या बाळांना बरोबर ठेऊ शकत नव्हते त्यांनी आपल्या बाळांबरोबर काय केलं?
    ७. ही जर तुमची खरी-खुरी बाळं असती तर त्यांना संभाळनं तुम्हाला आवडलं असत का?
    ८. जर तुमचं बाळ अजारी किंवा रडकं असतं तर त्याला संभाळायला तुम्हाला आवडलं असतं का?

- सत्राच्या शेवटी सहभागींना सांगा की, संगोपनाचं काम कोणासाठीही आनंददायी असू शकतं आणि त्यात अडचणी आणि जबाबदारी असतेच. संगोपनाचं काम फक्त मुलांच्या बाबतीतच लागू होत नाही तर आपल्या आयुष्यात असणाऱ्या सर्व सजीवांना आणि वस्तूंना संगोपनाची गरज असते.

## सत्र ४– वस्तु, झाडे, पाळीव प्राणी आणि व्यक्तिंचे संगोपन

**सत्राचे उद्देश:** या सत्रानंतर सहभागींना संगोपनाशी संबंधीत विविध पैलूंबद्दल समज निर्माण होईल

**सत्राची पद्धती:** गटचर्चा आणि पथनाट्य

**साहित्य:** चित्र– सायकल, रोप, कुत्रा, व्यक्ती

**सत्रासाठी लागणारा वेळ:**

**कृती:**

- सहभागींना चार गटांमध्ये उभे रहायला सांगा
- प्रत्येक गटाला घडी घातलेली चित्राची एक चिठ्ठी द्या
- सहभागींना गटात चित्राची चिठ्ठी उघडुन पहायला सांगा (गट क्र १– रोपं, गट क्र२–सायकल, गट क्र ३– कुत्रा, गट क्र ४– व्यक्ती)
- गटामध्ये सहभागींना आपापल्या वस्तूंचे वर्णन करायला सांगा
    १. रोप कोणत्या प्रकारचं आहे, किती उंच आहे, फळाचे आहे की फुलाचे आहे इ.
    २. कुत्रा किती वर्षांचा आहे, कोणत्या रंगाचा आहे, नर आहे की मादी, कोणत्या जातीचा आहे, त्याचे कान कसे आहेत, त्याचे केस कसे आहेत इ.
    ३. व्यक्ती किती वर्षांची आहे, तीचा रंग कसा आहे, दिसते कशी, केस कसे आहेत, नाव काय आहे इ.
    ४. सायकल कोणत्या कंपनीची आहे, कोणत्या रंगाची आहे, किती मोठी आहे, कशी आहे इ.
- सहभागींना आपल्या वस्तूंना जास्तीत जास्त जिवंत करण्यास प्रोत्साहीत करा
- यानंतर सहभागींना सांगा की तुमची सायकल, रोप, कुत्रा आणि व्यक्ती अडचणीत आहेत. उदा. सायकल बिघडली आहे, रोप सुकुन चाललय, कुत्रा काही खात नाहीये आणि व्यक्ती आजारी पडली आहे
- सहभागींना सांगा की प्रत्येक गटाने आपल्या वस्तु, व्यक्ती आणि प्रण्यांच्या समस्या दुर करण्यासाठी तुम्ही काय काय कराल या संदर्भात प्रत्येक गटाने एक पथनाट्य सादर करायचे आहे.
- सहभगींना पथनाट्य तयार करण्यसाठी पुरेसा वेळ द्या आणि नंतर गटाप्रमाने सर्वांसमोर पथनाट्याचे सादरीकरण करायला सांगा
- पथनाट्याचे सादरीकरण झाल्यानंतर पुढील प्रश्नांवरती सहभागींबरोबर चर्चा करा
    १. वेगवेगळ्या वस्तूंच्या संगोपनात फरक जाणवला का? कोणता?

२. कोणाचे संगोपन करणे सोपे वाटते? का?
३. कोणाचे संगोपन करणे जास्त कठीण वाटते का?
४. कोणत्या प्रकारचे संगोपन जास्त आनंददाई वाटते? का?
५. कोणत्या प्राकरचे संगोपन आनंददायक वाटले नाही? का?
६. जर तुम्ही संगोपन केले नाही तर सायकल, रोप, कुत्रा आणि व्यक्ती यांचे काय होइल असे तुम्हाला वाटते?
७. संगोपन कसे करायचे हे आपल्याला जन्मतानाच माहिती असते कि शिकायला लागते?
८. पुरुष आणि स्त्रिया एकाच पध्द्तीने संगोपन करतात का? दोघांच्याही संगोपन करण्यामध्ये काय फरक असतो?

- सत्राच्या शेवटी सहभागींना सांगा की, जगामध्ये अनेक वस्तूंबरोबर आपले संबंध येत असतात. आपल्या सगळ्यांच्या जीवनात संगोपनासाशी संबंधीत अनेक गरजा असतात आणि त्या गरजांना पुर्ण करण्यासाठी आपण सर्वजन आवश्यक त्या गोष्टी करत असतो. आपण असं म्हणू शकत नाही की पुरुष संगोपनाशी जोडलेले नसतात, ते त्यांना आवडणाऱ्या गोष्टींच्या संदर्भातील संगोपनाच्या कामाशी जोडलेले असतात उदा. झाडं, प्राणी, शेती, गाड्या इ. पण घरातील किंवा इतर कोणत्याही व्यक्तींच्या संगोपनाच्या मुद्याला सेवेचं रुप देऊन त्याचं सामाजिकीकरण केलं जातं. विशेषत: लहान मुलांच्या संगोपनाला महिलांची जबाबदारी मानलं जातं. संगोपनाच्या या मुद्द्यावर सतत पणे बोलतं रहाणं गरजेचं आहे आणि पुरुषांचा आपल्या मुलांच्या संगोपनातील सहभाग वाढावा यासाठी त्यांना प्रोत्साहीत केले पाहिजे. याच बरोबर जे पुरुष आनंदाने आपल्या मुलांचा संगोपनाची जबाबदारी घेतात त्यांचे उदाहरण समाजापुढे ठेवले पाहिजे.

## सत्र ५: संगोपन आणि सामाजिकीकरण

**उद्देश:** या सत्राच्या माध्यमातून सहभागींना संगोपनात समाविष्ट असणाऱ्या लिंगावर आधारित भेदभावासंदर्भात समज निर्माण होईल

**सत्राची पद्धती:** गटकार्य

**सत्रासाठी लागणारे साहित्य:** वर्तमान पत्रामधील फोटोंची कात्रणे (लहान मुले, प्रौढ, वृद्ध, आजारी व्यक्ती, तुटलेली खेळणी, पाळीव प्राणी, जनावरे, इलेक्ट्रॉनीक सामग्री, इ.) कमीत कमी २ सेट

**सत्रासाठी लागणारी वेळ:**

**कृती:**

- सहभागींना दोन गट करायला सांगा. प्रत्येक गटात साधरणपणे ६ ते १० इतक्या व्यक्ती असाव्यात

- प्रत्येक गटाला चित्राचा एक सेट द्या यचबरोबर प्रत्येक गटाला दोन चार्ट पेपर द्या. त्यातील एका चार्ट पेपर वर महिला आणि दुसऱ्यावर पुरुष असे मोठया अक्षरांत लिहायला सांगा
- यानंतर सहभागींना सांगा की त्यांना दिलेली चित्रे कापून महिला किंवा पुरुष कोण चांगल्या प्रकारे संगोपन करतात या आधारावर दोन्हीपैकी एका चार्ट पेपर वर चिकटवा . उदा. सायकल: पुरुष सायकलची चांगली देखभाल करु शकतात कारण ते सायकल वापरतात. म्हणून ते चित्र पुरुषांच्या चार्ट पेपरवरती चिकटवा.
- हे काम पुर्ण करण्यासाठी सहभागींना पुरेसा वेळ द्या आणि नंतर आपापल्या चार्ट पेपर चे सादरीकरण करायला सांगा
- सादरीकरणानंतर सहभागींबरोबर पुढील मुद्द्यांवर चर्चा करा
    १. कोणती चित्रे पुरुषांच्या चार्ट पेपर वरती आहेत? का?
    २. कोणती चित्रे महिलांच्या चार्ट पेपर वरती आहेत? का?
    ३. कोणती चित्रे दोनही चार्ट पेपर वरती आहेत? का?
- वरिल प्रश्नांना जोडूनचं खालील प्रश्नांवरती गटामध्ये चर्चा करा
    १. कोण चांगल्या प्रकारे संगोपण करते? का?
    २. महिला आणि पुरुष यांच्या संगोपन करण्याच्या पद्धतींमधील भेदभाव काढून टाकून संगोपनाच्या काही वेगळ्या पद्धती असू शकतात क?
    ३. महिलांच्या चार्ट पेपरवरती चिटकवलेल्या व्यक्तिंचे किंवा वस्तूंचे पुरुष संगोपन करु शकतात का?
    ४. पुरुषांच्या चार्ट पेपरवरती चिटकवलेल्या व्यक्तिंचे किंवा वस्तूंचे महिला संगोपन करु शकतात का?
    ५. महिला चांगले संगोपन करतात आणि पुरुष चांगली मदत करतात याबद्दल तुमचे काय मत आहे?
    ६. पुरुष बाहेर काम करतात आणि महिला घर संभाळतात याबद्दल तुमचे काय मत आहे?
    ७. परुष स्वत:चे संगोपन करतात का?का?
    ८. महिला स्वत:चे संगोपन करतात का?का?
    ९. साधरणपणे संगोपनाच्या कामात कोण जास्त असतं महिला कि पुरुष?
- सत्राच्या शेवटी सहभागींना सांगा की, आपल्या आसपास साधरणपणे महिला लहान मुलं, घरातील व्यक्ती, जनावरे यांचे पालन पोषण करताना दिसतील तर पुरुष इलेक्ट्रॉनिक वस्तू, शस्त्रे जसे की, पिस्तूल, तलवार इ, गाड्या, जमीन यांचे संगोपन करताना दिसतील. याचे कारण दोघांनाही लहानपणी मिळालेली वागणूक, लहान असताना मुलांना खेळायला गाडी, बंदुक मिळते तर मुलींना बाहूली, भांडी–कुंडी दिली जातात पुढे मोठे झाल्यानंतर दोघेही याच वस्तूच्या संगोपनात जास्त जोडले जातात. अशापद्धतीने संगोपनाच्या कामाची विभागणी सामाजिकीकरणाच्या आधारावर केलेली असते ज्यामध्ये बदलही करता येवू शकतात.

# सत्र ६: स्वतःचे संगोपन

**सत्राचे उद्देश:** या सत्रामुळे तरुण आणि प्रौढ पुरुषांना स्वतःच्या संगोपनाचे महत्व कळेल

**सत्राची पद्धत:** गटचर्चा आणि स्पर्धा

**सत्रासाठी लागणारे साहित्य:** चार्टपेपर आणि बोर्ड मार्कर

**सत्रासाठी लागणारी वेळ:**

**कृती:**

- सहभागींना चार गट करायला सांगा प्रत्येक गटात साधारनपणे ४ ते ६ सहभागी असावेत . यानंतर त्यांना सांगा की आपण आता प्रश्नोत्तर स्पर्धा घेणार आहोत
- गटांमध्ये उभे राहील्यानंतर सहभागींना सांगा की प्रत्येक गटासाठी प्रश्न विचारले जातील. प्रत्येक प्रश्नावरती गटात चर्चा करुन त्याचे उत्तर आपल्या वहित लिहून ठेवायचे आहे यासाठी अर्धा ते २ मिनिट इतका वेळ दिला जाईल आणि गटातील एका व्यक्तीने ते वाचून दाखवायचे आहे.
- फॅसिलिटेटर ने सहभागींना वाचून दाखवावेत किंवा बोर्ड वरती लिहून काढावेत
- सहभागी उत्तर वाचून दाखवत असताना फॅसिलिटेटर ने त्यांची उत्तरे आपल्या वहित लिहून ठेवावीत आणि स्पर्धेच्या शेवटी सगळ्या गटांना त्यांचे गुण किती झाले हे सांगावे
- उत्तर देण्यासाठी प्रत्येक गटाला संधी मिळेल जसे कि. प्रश्न क्र.१ चे उत्तर गट क्र.१ देईल, प्रश्न क्र.२ चे उत्तर गट क्र.२ देईल. परंतू सगळ्या गटांनी सगळ्या प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे
- प्रश्नाचे उत्तर देत असताना प्रत्येक गटाने त्यामागचे आपला तर्क काय आहे हे देखील सांगणे अपेक्षित आहे
- स्पर्धेसाठीचे प्रश्न पुढील प्रमाणे

| क्र. | प्रश्न | महिला | पुरुष | दोघे |
|---|---|---|---|---|
| १. | कोणाचे आयुष्य कमी असते? | | | |
| २. | मारामारीत कोण जास्त मरते? | | | |
| ३. | रस्त्यांवर अपघातात कोण जास्त मरते? | | | |
| ४. | आत्महत्या करून कोण जास्त मरते? | | | |
| ५. | कोन जास्त मारामारी करते? | | | |
| ६. | कोण जास्त चोरी करते? | | | |
| ७. | कोण जास्त दारू पिते? | | | |
| ८. | मादक पदार्थांच्या सेवनाने कोण जास्त मरते? | | | |
| ९. | नवजात बालकांमध्ये कोण जास्त मरते? | | | |
| १०. | किशोरावस्थेत धोके घेऊन कोण जास्त मरते? | | | |
| ११. | अपघातांमध्ये कोण जास्त मरते? | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२. | एच. आइ.व्ही/एड्स संक्रमित होण्याची संभावना कोणाला जास्त असते? | | | |

- खेळाच्या शेवटी सहभागींना सांगा की प्रत्येक प्रश्नामध्ये उत्तरात पुरुषांची संख्या जास्त होती. यावर चर्चा करण्यासाठी सहभागींना प्रोत्साहीत करा. त्यांना हे माहिती होतं का? असं का होतं? आणि हे थांबविण्यासाठी आपण काय करायला हवं या प्रश्नांवरती साहभागींबरोबर चर्चा करा.
- खालील प्रश्नांवरती सहभागींबरोबर चर्चा करा–
    १. जर पुरुषांनी स्वतःची देखभाल निट केली तर त्यांची स्थिती अशीच राहील का?
    २. पुरुषांना कोणत्या प्रकारच्या तणावांचा सामना करावा लागतो?
    ३. महिलांना कोणत्या प्रकारच्या तणावांचा सामना करावा लागतो?
    ४. जर तुम्ही आजारी पडलात तर तुम्ही काय कराल?
- सत्राच्या शेवटी सहभागींना सांगा कि आकस्मिकपणे मृत्यू होण्यामध्ये पुरुषांची संख्या जास्त असते कारण त्यांची घातक जीवनशैली. पण या सगळ्या गोष्टींवरती पुरुषांसोबत बोलून त्यांच्या जीवशैलीत बदल आणता येवू शकतात.

बापांची शाळा
Fatherhood Campaign, Maharashtra

**बापांची शाळा....**

## सम्यक ची भूमीका–

पुरुषांची भूमिका समाजमध्ये कमवाता, वंशाचा दिवा, पालनकर्ता अशा नजरेतूनस पाहीली जाते. मुलं आणि वडील यांचं नातही खूप व्यवहारीक पातळीवर पाहीलं जातं. मुलांना शाळेचं साहीत्य आणून देणं, खर्चाला पैसे पुरवणं, कपडालत्ता पुरवणं इ. पर्यंतचं वडीलांची भूमिका सिमीत राहीलेली दिसते. परंतू भौतीक गरजांच्या पलिकडेही मुलांच्या भावनिक गरजा असतात आणि त्या पुर्ण करण्यामध्ये वडीलांची भूमीका जवळ–जवळ नसतेचं ही प्रामुख्याने आईची जबाबदारी मानली जाते.

लहान बाळाचं वाढणं ही खरतर प्रत्येक कुटुंबासाठी ऐतिहासीक गोष्ट असते. शिवाय बाळाच्या पालन–पोषणामध्ये एक वेगळ्या प्रकारचा आनंद समावलेला असतो. जवळ असणाऱ्या प्रत्येक व्यक्तिबद्दल बाळाच्या मनात आपुलकी, प्रेम या भावना वाढीस लागत असतात. पालन–पोषणाच्या या प्रक्रियेत वडीलांचा सहभागच नसल्याने मुलं आणि वडील यांच्यामध्ये प्रेमाचे, हळवेपणाचे, संवादी नाते तयार होण्याच्या शक्यताच बंद होतात शिवाय पुरुष बाळाच्या वैकासिक प्रक्रियेसारख्या आनंददायी अनुभवाला मुकतात. या ऊलट आई म्हणून स्त्रीयांवरील कामाच्या जबाबदाऱ्या आणखीनच वाढतात आणि समाजातील लिंगभावावर अधारीत असमानताही कायम रहाते.

'पुरुषी' आणि 'बायकी' अशा चौकटींमध्ये कामाला बघण्याचा दृष्टीकोण जर नष्ट झाला तर बाळाला वाढविण्याचं काम पुरुषांसाठीही खूप आनंददायी आणि प्रक्रिया असू शकते. पुरुष म्हणून तयार केल्या गेलेल्या चौकटी मोडून मुलांबरोबरचे नातेसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करणारे काही पुरुष आपल्या असपास नक्कीच असतात पण त्यांचे प्रमाण कमी आहे. म्हणूनचं गावागावांमध्ये वेगेवेगळ्या वातावरणात, संस्कृतीत आणि जाती व वर्गांच्या स्तरांमध्ये घडविल्या गेलेल्या कठोर, निष्ठूर आणि तापट बापांच्या भूमिकांना आव्हान देऊन संवेदनशील, मायाळू, प्रेमळ आणि काळजीवाहू बाप बनू इच्छीणाऱ्या सर्वांसाठी व्यक्त होण्याचे ठिकाण ही **"बापांची शाळा"**!

CENTRE FOR HEALTH AND SOCIAL JUSTICE

सम्यक
संवाद व संसाधन केंद्र, पुणे

**सम्यक**
संवाद आणि संसाधन केंद्र
बी३/१४, दामोदर नगर हिंगणे खुर्द,
सिंहगड रोड, पुणे– ४११०५१
०९८५०५१६२३७
www.samyakindia.org